ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

एप्रिल ते जून २०२०




२७ मे २०२०

मसाप
११४ वा
## वर्धापन दिन

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Aundh Pune-67

156

मुद्रक-प्रकाशक
**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

जाहिरात व्यवस्थापक
**वि. दा. पिंगळे**
९८८१२३५०३३

संपादकीय संयोजन
**संदीप खाडे**

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्प**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मुद्रणस्थळ
**एस. ए. प्रिंटर्स, एल. एल. पी.**
फ्लॅट नं. ५, ३ रा मजला,
सिद्धीविनायक अपा.,
शिवदर्शन, पुणे ४११००९

मूल्य : १५ रुपये

प्रकाशन क्र. ३७०
एप्रिल ते जून २०२०

या अंकात व्यक्त झालेल्या
विचारांशी संपादक, संपादन समिती,
सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक
सहमत असतीलच असे नाही.



# अंतरंग

**मसाप पत्रिका**
**एप्रिल ते जून २०२० अंक**

- मानवी इहवादी सौंदर्यसिद्धांत । **यशवंत मनोहर** । ५
- रत्नाकर मतकरी : सव्यसाची अष्टमार्गी । **विजय तापस** । २४
- वाङ्मयेतिहासाचे अध्ययन व अध्यापन ।
  **प्रा. डॉ. राजाराम भैलुमे** । २८
- अरुणा ढेरे यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास : अरुणोदय ।
  **डॉ. चंद्रकांत भगवंत पोतवार** । ३२
- महाभारतातील दोन कृष्ण । **भिवा कांबळे** । ३५
- अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री जाणिवा -
  **डॉ. वृंदा सुभाष कौजलगीकर** । ४१
- उपेक्षितांचे चित्रण करणारे कथालेखक अण्णाभाऊ साठे ।
  **सोमनाथ महादेव दडस** । ४६
- पिढीजात : शासकीय व्यवस्थेचं समंजस उत्खनन ! ।
  **पी. विठ्ठल** । ५०
- ज्ञानाचे 'अग्निहोत्र' व्रत आचरणारा ज्ञानतपस्वी-
  डॉ. अशोक कामत । **दीपक करंदीकर** । ६०
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शंभर वर्षांपूर्वीचे 'मूकनायक'-
  **डॉ. हरिश्चंद्र निर्मळे** । ६६
- यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणांची वाङ्मयीन गुणवत्ता।
  **डॉ. भास्कर ढोके** । ७३
- आत्मशोधाकडून सत्यशोधाकडे जाणारी कादंबरी ।
  **राजीव जोशी** । ७७
- 'एका स्वर्गस्थ देशाच्या गोष्टी'ची उद्बोधक गोष्ट-
  **प्रा. डॉ. सुधाकर शेलार** । ८३
- लेखनातील क्रांतिकार्य । **प्रा. डॉ. गणेश राऊत** । ८८
- बाईपणाचा ताळेबंद- स्मरणवेळा । **डॉ. संजय नगरकर** । ९१
- आत्मभानोत्तर काळाचे हुंकार- फक्त सैल झालाय दोर ।
  **डॉ. फुला बागूल** । ९८

Dr. Babasaheb Ambedkar M... Aundh, Pune-67

157

ज्येष्ठ लेखिका प्रतिभा रानडे यांच्या 'स्मरणवेळा' या लेखसंग्रहाचे परीक्षण करणारा लेख.

# बाईपणाचा ताळेबंद : स्मरणवेळा

■ डॉ. संजय नगरकर




गजातुनी मी पाहत बसले
आकाशाचे सुनीळ मार्दव
पाताळातुनी सरसर आली
अंधाराची मुसळे भीषण

इंदिरा संतांच्या या काव्यपंक्ती वाचता-वाचता वाचक म्हणून आपण गुंतत जातो कवयित्रीच्या मनात उठलेल्या एकाकीपणाच्या कल्लोळात. सांजवेळा भरून काढणाऱ्या आठवणींच्या गहिऱ्या गाभाऱ्यात. तसेच काहीसे स्वरूप असते ललित गद्याचे, ज्यासच वि.शं. चौगुले यांनी मुक्तगद्य असे संबोधले आहे, तर आनंद यादव त्यास इंग्रजीत 'फॉर्मलेस फॉर्म' अशी संज्ञा असल्याचे नोंदवितात. भावकवितेशी नाते सांगणारा, आत्मसंवादी स्वरूपाचा, तर कधी स्मरणकोशातील अनुभवांवर भाष्य करणारा असा हा वाङ्‌मयप्रकार अनेक लेखक-लेखिकांनी समृद्ध केला. निबंध, वैचारिक निबंध, लघुनिबंध असा प्रवास करीत करीत नंतर तो 'ललितगद्य' या नावाने स्थिरावला, त्याचा मूळ प्रेरक मॉन्तेन हा लेखक मानला जातो. त्याचे स्वरूप काहीसे 'कोलाज' सारखेच आहे. 'स्मरणवेळा' या लेखसंग्रहाचे अवलोकन करताना त्याचा प्रत्यय येतो. लेखिका प्रतिभा रानडे त्यासंदर्भात म्हणतात, 'दैनंदिन कष्टप्रद आयुष्य जगताना हवा असतो चित्त स्वस्थ करणारा अवकाश. जगून झालेल्या आयुष्यातील स्मरणवेळा हा अवकाश देत असतात. त्याच अवकाशात नितळपणे दिसू लागतात इतिहासचित्र..... हे सारं मनाच्या ओंजळीत अलगद पकडून लिहिलं जातं स्मृतिवृत्त. ते वाचायचं पुन:पुन्हा आल्हाददायक भविष्यासाठी...'

**प्रतिभा रानडे संक्षिप्त परिचय:**

स्त्री लेखिका म्हणून लेखन करणाऱ्या प्रतिभा रानडे यांचा आस्थाविषय 'स्त्रीत्वाचा शोध आणि बोध' हाच आहे. स्त्रीवादी साहित्याच्या क्षेत्रातील एक आश्वासक



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

158



नाव म्हणजे प्रतिभा रानडे होत. 'बुरख्याआडच्या स्त्रिया', 'स्त्रीप्रश्नांची चर्चा : एकोणिसावे शतक', 'स्मरणवेळा' मधील बहुतांशी लेखन या त्यांच्या पुस्तकांमधून त्यांची ओळख होते. तसेच पतीसमवेत अनेक परदेशांमध्ये, विशेषतः मुस्लिमबहुल देशांमध्ये अनेक वर्षे वास्तव्य केल्यामुळे तेथील अनुभव, मुस्लिम धर्मातील स्त्रियांची स्थिती, धार्मिक पुनरुज्जीवनवाद, स्त्री प्रश्नांचा अभ्यास व लेखन करणाऱ्या स्त्रिया, कलावंत-विचारवंतांचे जगणे व जगण्यातील विसंगती, यांविषयी त्यांनी केलेले लेखन भावकाव्याच्या व चिंतनाच्या पातळीवर उतरते. अमृता प्रीतम यांच्या कादंबरीचा केलेला 'बंद दरवाजा' हा अनुवाद, 'बदनसीब','मानुषी', 'रेपोट्या' या कादंबऱ्या, तसेच 'काबूल कंदाहारकडील कथा', 'परके रक्त', हे कथासंग्रह त्यांनी लिहिले. वैचारिक व ललितगद्यपर 'अफगाण डायरी', 'यशोदाबाई आगरकरांच्या आठवणी: एक आकलन', 'शुक्रवारची कहाणी', 'ऐसपैस गप्पा दुर्गाबाईंशी', 'ऐरणीवरचे प्रश्न : 'समान नागरी कायदा' अशा विविध ग्रंथांचे लेखन प्रतिभा रानडे यांनी केले आहे. स्त्रीमनाचा हळवेपणा, स्त्रीवादी भूमिकेची तटस्थता, वैचारिकता व चिंतनशीलता, तत्त्वचिकित्सक शैली, स्मरणरम्यता व वर्तमान वास्तव यांतील समतोल, काव्यमयता व भावव्याकुळता या वैशिष्ट्यांनी त्यांचे लेखन समृद्ध झाले आहे.

**स्त्रीवाद व स्त्रीत्वाचा ताळेबंद :**

'स्मरणवेळा' मधील बहुतांशी लेखांमधून बाईपणाचा ताळेबंद मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यादृष्टीने सदर लेखसंग्रहात 'बाईपणाचा ताळेबंद', 'राजकन्या लुपसुंग आणि रुकय्या सुलताना', 'कोलाज', 'मैत्र जीवाचे', 'पधारो म्हारे देस', 'सद्गुण मंजिरी आवडाबाई भिडे', या लेखांचा विचार करता येईल.

बाईपणाचं ओझं धुडकावण्याचा कितीही प्रयत्न केला तरी, ती अशक्य बाब आहे हे सनातन सत्य मांडताना लेखिकेने अनेक जागतिक संदर्भ देत, स्वतःच्या जीवनप्रवासाचा धांडोळा घेत त्याची चिकित्सक मांडणी केली आहे. 'प्रत्यक्ष आपल्याच घरात आपण निव्वळ बायकोच असतो. सतत ऐरणीवरच असतो. बाई म्हणून, आई म्हणून आपली काही कर्तव्यं आहेत, जबाबदाऱ्या आहेत, त्या पार पाडायलाच हव्यात. त्यासाठी वेळ पडल्यावर आपला आत्मसन्मानदेखील घरच्या दावणीला बांधावा लागतो. दावण तोडण्याची हिंमत, आयुष्यभर बाळगलेला शहाणपणा, समजूतदारपणा आपणच घालवून बसलेलो असतो. बाईपणाच्या कोषातून बाहेर पडत नाही तोपर्यंत बाई स्वतःकडे कोणत्या दृष्टिकोनातून बघते यापेक्षा पुरुष तिच्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून बघतो यालाच महत्त्व येणार.' (पृष्ठ ३४ ) असं हे बाईपण व बालपणापासून लग्न होईपर्यंत पुरुषांच्या बुभुक्षित नजरांनी घायाळ होण्याचे जे प्रसंग अनुभवले त्यावर केलेले भाष्य 'बाईपणाचा ताळेबंद' यातून केलेलं आहे. स्त्री ही एक उपभोग्य वस्तू मानून पुरुषप्रधान संस्कृतीने तिच्यावर अनेक बंधने लादली; परंतु या बंधनांपेक्षा 'शहाणपण व समजूतदारपणा बाईचा दागिना असतो' असे म्हणणारी आई, 'मुलीच्या जातीला या सगळ्या गोष्टी यायला हव्यात' हे बालपणापासून झालेले संस्कार, सुरक्षितपणाच्या उबेचा प्रभाव आदी गोष्टींमुळे कितीही ठरवले तरी बाईपणाचं ओझं उतरवणं शक्य नसल्याची कबुलीही लेखिका देते. शेवटी म्हणते, 'पण मला तर पिंजरा जाळून टाकायचा नव्हता; कारण त्यामध्ये इतरांना आणि मलाही सुरक्षितपणा मिळत होता. स्वतःचे पंख छाटून घ्यायचे नव्हते. (पृष्ठ३५) मुक्तपणे सिगारेट ओढणाऱ्या पोक्रीस्कीला म्हणते, ' आम्हा मध्यमवर्गीय बायकांना फक्त संस्कृती वगैरेंची बंधनं... परंपरा आणि आधुनिकता यामध्ये भारतीय बायकांची फार ओढाताण होते. कसं सांगू तुला ?(पृष्ठ ३२) ही लेखिकेची खंत तिच्या मनातील द्विधा अवस्थेचे दर्शन घडविते.

अर्थात केवळ भारतातीलच नव्हे तर



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

पाकिस्तानसारख्या धार्मिक पुनरुज्जीवनवादी व इंग्लंडसारख्या मुक्तद्वार संस्कृती असलेल्या देशांतील स्त्रियांचीदेखील हीच अवस्था असल्याचे 'कोलाज'या लेखांतून मांडले आहे. पाकिस्तान दूतावासात ज्येष्ठ अधिकारी असलेल्या पतीची पत्नी व 'वेदकाळ ते आजपर्यंतचे स्त्री जीवन' या विषयावर संशोधन करणारी शमा सईद, गुजराथी माणसाशी लग्न केलेली अँनी ग्लेझीयर,आणि घरच्यांचा विरोध पत्करून दुप्पट वयाच्या इसमाशी लग्न केलेली व एका मुलीसह पुन्हा घटस्फोट घेऊन पुनर्विवाह केलेली विभा या तिघीही आपापल्या आयुष्यात दुःखी असल्याचे दिसते. हे दुःखही बाईपणाचंच आहे. सुशिक्षितपणाच्या बुरख्याआड चाललेलं त्यांचं मूक रुदन लेखिकेला ऐकू येते. शेवटी सारं काही अवलंबून असतं ते पुरुषांच्या मर्जीवरच. या सर्व गोष्टींचा विचार करताना लेखिकाही सुन्न होते व म्हणते, 'मन अधिक हळवं होऊन जातं. अस्वस्थ होतं. कसल्यातरी संतापानं भरून जातं. मन थकून जातं. शरीरही थकून गेलेलं असतं' (पृष्ठ८७) शेवटी स्त्रीपणाच्या दुःखाचे हे 'कोलाज' केवळ वैयक्तिक नव्हे तर वैश्विक असल्याचे सत्य लेखिका मांडते.

फ्रेंच विचारवंत सार्त्र व सिमॉन दि बूव्हा यांच्या जगावेगळ्या मैत्रीचा वेध घेणारा 'मैत्र जीवाचे' हा लेख विचारप्रवण आहे. प्रस्थापित जीवनमूल्ये धुडकावून देऊन, विवाहसंस्थेची बंधने नाकारून आयुष्यभर उघडपणे एकमेकांच्या सहवासात राहण्याचे धाडस करणारे सार्त्र व सिमॉन यांची ही कहाणी 'स्त्रीमुक्तीचा जाहीरनामा' असल्याचे लेखिका म्हणते. सार्त्रमध्ये आपला पिता, मित्र, मार्गदर्शक पाहणारी, त्याच्या मुक्त विचाराने व खंबीर पाठिंब्याने आत्मविकास साधणारी, मित्रत्व व प्रीती यांची आयुष्यभर जपणूक करणारी सिमॉन प्रामाणिक व स्वयंप्रकाशी आहे. समाजाचा सर्व पातळीवरील रोष पत्करून जगावेगळा संसार करणाऱ्या सीमॉनची शोकांतिका का व्हावी? मुक्त विचारांचा सार्त्र तिच्याशी बरोबरीने वागतो, तिचे स्वातंत्र्य अबाधित ठेवतो, स्वयंनिर्णयाचा अधिकार मान्य करून विवाहाशिवाय तिच्याबरोबर राहतो यातून त्याची प्रतिमा उच्च व उदात्त रूपात उभी राहते; परंतु त्याचा पुरुषी अहंकार व स्वार्थ फणा वर काढतोच, आणि इथेच खरी सीमॉनची फसगत झाल्याचे लेखिका सांगते. खरे तर हे नातेच फसवे होते, असे लेखिकेला वाटते. शेवटी पुरुष तो पुरुषच हे सनातनी सत्य असल्याचे सूचित केले आहे.

आनंदीबाई, रखमाबाई व आवडाबाई या एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी विचारधारेतल्या तीन प्रमुख स्त्रियांच्या जीवनाचा साक्षेपी वेध घेणाऱ्या 'सद्गुणमंजिरी आवडाबाई भिडे' नावाचा लेख या संग्रहात येतो. खरे तर लेखिकेचा आस्थाविषय असलेले एक चरित्र गणेश जनार्दन आगाशे यांनी लिहिले.त्याचेच हे टीकात्मक परीक्षण आहे. एकोणिसाव्या शतकातील बालविधवेची दुःखे आवडाबाईच्या माध्यमातून मांडली आहेत. विचाराने प्रगल्भ व मनाने संवेदनशील असलेल्या

---

**गांधीहत्येनंतरच्या जाळपोळीत नष्ट झालेल्या; आपलं घर, त्या परिसरातील माणसं, त्यांच्या संगत-विसंगत स्वभाववृत्ती, आप्पा ( वडील ) यांचा व आईचा परोपकारी स्वभाव आदी बालपणाच्या; काढलेल्या आठवणी मांडलेला 'नैहर छुटो न जाय' हा लेख आहे. लेखिका म्हणते, 'कोल्हापूरच्या त्या जुन्या घरात गुंतलेलं मन ३७ वर्षांनंतरही निर्मोही होत नव्हतं.' इचलकरंजीला वसंत व्याख्यानमालेच्या निमित्ताने गेलेल्या लेखिकेचे पाय सहजपणे तिकडे वळतात व टकळीतून सूत बाहेर पडावे तशा आठवणी बाहेर पडतात. जीवावर बेतलेल्या त्या प्रसंगाची आठवण, तेव्हाची अनामिक भीती, आप्पांवर पडणारा लाथांचा वर्षाव व पिसाळलेला जमाव, अय्यरांच्या रूपाने धावलेला परमेश्वर, त्यांनी केलेली सुटका, आप्पांची तत्त्वनिष्ठा, कुठेकुठे भेटलेले माणुसकीचे झरे आणि गावाकडच्या त्या घराच्या सांदीकोपऱ्यातून धावलेली बालपावले या सर्वांविषयीच्या आठवणी लेखिकेला अनावर होतात.**

---



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

आवडाबाईंचे लग्न अकराव्या वर्षी व वैधव्य सतराव्या वर्षी आले. अशा स्थितीत विधवांवर धर्मपरंपरांची जाचक बंधने असतानाही आवडाबाईंने पुढे शिक्षण घेण्याचे केलेले धाडस लेखिकेला कौतुकास्पद वाटते. त्याकाळात तिने चित्रकार होण्याचे धाडस दाखविणे ही मोठी क्रांती वाटते; परंतु त्याचवेळी तिच्यासारख्याच अकराव्या वर्षी विवाह झालेल्या रखमाबाईंने आपल्या गावंढळ व अडाणी अशा न आवडणाऱ्या दादाजींशी संसार न करण्याचे धाडस दाखविणे अतिशाहाणपणाचे वाटते. यातील विसंगती मांडताना लेखिका आवडाबाईच्या मर्यादांवर प्रकाश टाकते. शेवटी तिलाही परंपराभिमानी स्त्रीप्रतिमेतून बाहेर न पडता आल्याची नोंद लेखिका करते. तुलनेने न आवडणाऱ्या पतीशी संसार करायचा नाकारून दोन वर्षांचा तुरुंगवास भोगणाऱ्या रखमाबाईचा धीटपणा अधिक भावतो. परदेशात एकटीने जाऊन शिकून आलेल्या डॉक्टर आनंदीबाई जोशींचा संदर्भही आवडाबाईच्या रोजनिशीतून जागा होतो. अर्थात, 'समाजाला दुखवून काहीही करण्याचं धारिष्ट्य तिच्याजवळ नव्हतं.' (पृष्ठ १४४) ही आवडाबाईची मर्यादा लेखिका नोंद करते.

'पधारो म्हारे देस' हा लेख तसा राजस्थानच्या कलावैभव व उज्वल इतिहासातील दुखऱ्या कोपऱ्यांचा घेतलेला वेध आहे. आपलं राजवैभव जपण्यासाठी राजघराण्यांनी, सरदारांनी मुलीलेकींना दिल्लीश्वराच्या जनानखान्यात पाठविणे आणि चित्तोडच्या रत्नसिंहाच्या रूपसुंदर पत्नी पद्मिनीने हजारो महिलांसह एकलिंगजीचा घोष करून अग्निकुंडात उड्या घेऊन जोहार करणे. स्वत्व जपणे या परस्परविसंवादी विचारांचा ताण लेखिकेला असह्य होतो. लेखिका म्हणते, 'यश-अपयश या सगळ्या भावनांच्या, स्पंदनांच्या लाटा आदळत होत्या? केवढं धगधगीत आयुष्य जगली होती ही माणसं?' (पृष्ठ १७७) भारत-पाक फाळणीचा वर्तमान संदर्भ देत, त्या वेळी देखील कित्येक हिंदू स्त्रियांनी आपलं स्वत्व जपण्यासाठी विहिरीत उड्या मारून जीव दिला. प्रसंगी घरच्या बायकांना घरच्या पुरुषांनीच आपल्या हाताने मारले. त्या स्त्रिया समाजाच्या लेखी शूर व शहाण्या ठरल्या, तर ज्या स्त्रिया या सर्व गदारोळात परधर्मीयांच्या घरी आसरा घेत वाचल्या त्या मात्र कित्येक हिंदूंनी नंतर नाकारल्या. याचा दुखरा सल सदर लेखातून व्यक्त होतो. प्रसंगी जोधपूरचा राजा मानसिंग व त्याच्या पाच बायका व पाच दासींना जाळलं गेलं. पुरुषांच्या माघारी जगणं हे किडा-मुंगीचे म्हणून सती जाणे हे पुण्यकर्म मांडणाऱ्या मानसिंगाच्या बायका व  हे अजूनही चालू आहे. संपलेलं नाही याची साक्ष देवरालाच्या रूपकंवरच्या प्रकरणावरून पटते. या सर्व आठवणींनी लेखिका व्याकूळ होते. मनात शूळ उठतो. तेव्हा म्हणते, 'कोणती मूल्यं कशासाठी जपायची, कोणत्या मूल्यांसाठी काय भरीला घालायचं ते कळत नाही'(पृष्ठ१२२) शेवटी समृद्धी, राजवैभव, राजकारणाचा पट, युद्ध आणि तह, युद्ध आणि पराभव या सर्वांच्या पटावर स्त्रियांना कळसूत्री बाहुल्यांसारखंच खेळवलं गेलं गेलं, भोगलं गेलं, आणि प्रसंगी जोहार करायला भाग पाडून तिचं दैवतीकरणही केलं गेलं. हा सर्व गुंता सदर लेखात उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

**स्त्री ही एक उपभोग्य वस्तू मानून पुरुषप्रधान संस्कृतीने तिच्यावर अनेक बंधने लादली; परंतु या बंधनांपेक्षा 'शहाणपण व समजूतदारपणा बाईचा दागिना असतो' असे म्हणणारी आई, 'मुलीच्या जातीला या सगळ्या गोष्टी यायला हव्यात' हे बालपणापासून झालेले संस्कार, सुरक्षितपणाच्या उबेचा प्रभाव आदी गोष्टींमुळे कितीही ठरवले तरी बाईपणाचं ओझं उतरवणं शक्य नसल्याची कबुलीही लेखिका देते. शेवटी म्हणते, 'पण मला तर पिंजरा जाळून टाकायचा नव्हता; कारण त्यामध्ये इतरांना आणि मलाही सुरक्षितपणा मिळत होता. स्वतःचे पंख छाटून घ्यायचे नव्हते.**

स्त्रीसामर्थ्याला धर्माच्या कडीकुलुपात बंद करणाऱ्या सर्व धर्मांची स्थापना करणारे सर्वच पुरुष होते. स्त्रीने धर्म स्थापन केल्याचे एकही उदाहरण जगात दाखविता येत नाही. पर्यायाने स्त्रीला भोगदासी बनविण्याचे षडयंत्र या धर्मसंस्थापकांनी नियोजनपूर्वक राबविले. त्यास धक्के देण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक स्त्रिया प्रारंभापासून



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Pune-67 *

आजपर्यंत पुढे आल्या. त्याचीही एक उज्ज्वल परंपरा आहे; परंतु धर्मस्थापनेत स्त्रीने पुढाकार का घेतला नाही? घेतला असेल, तर पुढे त्याचे काय झाले? ज्यांनी घेतला त्यांची शोकांतिका का झाली? या प्रश्नांचा वेध घेणारा 'राजकन्या लुप्सुंग आणि रुकय्या सुलताना' हा लेख आहे. गार्गी, मैत्रेयी, घोषा, अपाला, सूर्या, शची, गोधा, अदिती, विश्वधारा, आत्रेयी, वाक्यासारख्या अठरा स्त्रिया खऱ्या अर्थाने सूक्तकर्त्या होत्या, ब्रह्मवादिनी होत्या. पुरुषालाही सत्त्वशील, तपस्वी, ज्ञानी होण्याचा सल्ला देणाऱ्या होत्या. मग पुढच्या काळात असे काय घडले की, पातिव्रत्य, सती जाणे, बालविवाहात अडकणे त्यांच्या नशिबी आले? हा प्रश्न उपस्थित करून लेखिका पुरुषप्रधान संस्कृतीचा पायरव धर्म व नीतीनियमांच्या मांडामांडीत असल्याचे सांगते. या पोलादी भिंतीला राजकन्या लुप्सुंग आणि रुकय्या सुलतानाच्या रूपाने एक बारीकशी फट असल्याचे लेखिकेला दिसते; परंतु त्यांचीही अखेर शोकांत का व्हावी? हा प्रश्न लेखिकेला अस्वस्थ करतो. 'राजकन्या लुप्सुंग' हिची कहाणी काहीशी कल्पित; परंतु लोककल्याणकारी धर्माची स्थापना करणारी, सख्ख्या भावांनी पाठीत लाथ मारून हाकलून दिलेली, न्याय, सत्य, त्याग आणि उद्योगशीलता यांचा गौरव करणारी, धार्मिक तत्त्वे सांगणारी स्त्रियांच्या शोकांतिकेस कारणीभूत ठरणाऱ्या नीतिमूल्यांना उत्तरे देणारी; परंतु अशा लुप्सुंगला एका राजाने हाल हाल करून मारले. तिची ही कथा परीकथाच वाटते; परंतु या परीकथेचे वास्तव रूप म्हणजे १८८० साली तत्कालीन बांगलादेशात जन्माला आलेली रुकय्या सखावत हुसेन होय. आयुष्यभर मुस्लिम मुलींच्या उन्नतीसाठी झटलेल्या रुकय्याने लिहिलेल्या 'सुलतानाज् ड्रीम' या कथेचा संदर्भ येथे येतो. ज्याची संकल्पना मांडून जे जे स्त्रियांना सोसावे लागते ते ते पुरुषांनी करावे ही अपेक्षा न ठेवता स्त्रियांची कर्तव्ये पुरुषांनी केली तर काय बिघडते, अशी कल्पना या कथेत मांडली आहे. अर्थात या स्त्रीराज्यात स्त्रियांसारखे पुरुषांवर अन्याय नसून, तेथे सगळीकडे समृद्धी, सुख व समाधान आहे. अर्थात या कथेचे मर्म तत्कालीन समाजाच्या लक्षातच आले नाही, असे लेखिका नोंदवते. आज स्त्रिया ही हिंमत दाखवू लागल्याचे समाधान व्यक्त करताना, गेली चार हजार वर्षे त्यांना तेच ते सांगावं लागतंय याची खंतही व्यक्त केली आहे.

अशा या स्त्रीकेंद्रप्रधान लेखांमधून प्रतिभा रानडे देशोदेशीच्या स्त्रीवादाचे मासले आपल्यापुढे मांडतात; परंतु बाईपणाचं ओझं कितीही नाकारण्याचा प्रयत्न केला तरी, मानगुटीवर बसलेलं हे भूत उतरवणं सहजशक्य नसल्याची खंतही व्यक्त करते.

**आठवणींचा ताटवा :** 'स्मरणवेळा' तील इतर लेखांचा विचार करता, व्हॅनगॉग या जगद्विख्यात चित्रकाराचा व त्याच्या चित्रांचा आस्वादक भूमिकेतून घेतलेला वेध, व्हॅनगॉगच्या उपेक्षित व धीरगंभीर जगण्याचा त्याच्या चित्रातून घेतलेला शोध, त्याची अजब प्रेमकहाणी व विक्षिप्तासारखे वागणे 'क्रोज ओव्हर फिल्ड' या लेखांतून मांडले आहे. विमनस्क मन:स्थितीत आपल्या कानाची पाळी कापून देणारा व स्वत:वर गोळी झाडून घेणारा व्हॅनगॉग व त्याची चित्रे यातील नाते लेखिकेने शोधले. त्यासाठी संग्रहालये धुंडाळली व त्या चित्रांचा अर्थबोध करून घेताना त्याचे जीवनचित्रच लेखिकेच्या मन:चक्षुंसमोर तरारले. अखेरीस लेखिका म्हणते, 'व्हिन्सेंटचं चित्र बघितलं की, तिथं मला फक्त त्याच्या हाताच्या रंगरेषाच दिसत नाही, तर त्याच्यामागचं त्याच्या आयुष्यातलं सगळं दु:ख, एकलेपणा, मन:स्तापही दिसतो. मन उदास होतं.' (पृष्ठ १९)

सगळ्या कलांचा एकत्रित परिणाम साधणाऱ्या चित्रपट कलेची आवड व बालपणापासून जोपासलेले चित्रपटवेड, चित्रपटक्षेत्राचा बरा आणि वाईट असा दोन्ही प्रकारांचा परिणाम, काळाचे अंतर कमी करणारे व आठवणींना उजाळा देणारे हे माध्यम व त्यात गुंतत गेलेलो आपण यांचा धांडोळा घेणारा 'सिनेमाचा ऋतू' हा लेख. नव्या पिढीचा दृष्टिकोन या क्षेत्राविषयी किती उथळ, वरवरचा आहे याची खंत यातून व्यक्त झालेली दिसते.

मुस्लीम धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या मजारे शरीफ या पवित्र क्षेत्राला काबूलमधील वास्तव्यात भेट दिली असता, कोणते अनुभव आले? त्याकडे पाहून मनात जे विचारतरंग निर्माण झाले त्याचे चित्रण करणारा 'निळ्याशार घुमटाखाली' हा लेख प्रवासवर्णन व स्थलवर्णनपर आहे. येथील भव्य, प्रशस्त व सुंदर मस्जिद, त्यावर बसलेली कबुतरे हे दृश्य पाहून लेखिकेच्या मनात एकाच वेळी उत्कटता व उदासी या परस्परविरोधी भावना



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

162

निर्माण झाल्या. त्याचा शोध लेखिका घेते. तसेच प्रवासातील 'बल्ख' या जगातील पहिल्या वैभवशाली शहराची, आर्य संस्कृतीचे माहेरघर ही खूण ओळख, तेथील कतलींचा रक्ताळलेला इतिहास लेखिकेच्या नजरेसमोरून सरसर जातो. प्रवासात बंदूकधारी वाटमाऱ्यांच्या हातून काहीही इजा न होता सुखरूप आल्याचं समाधान व त्याचवेळी बरोबरच्या ड्रायव्हरने प्रवास संपल्यावर गाडीचे ब्रेक तुटले होते ही धक्कादायक गोष्ट सांगणे अशा घटनांचा पट या लेखातून उलगडलेला आहे. अखेरीस, 'असे जोडले गेलेले ऋणानुबंध, ओळखी,संबंध, काहीच शाश्वत नसतं, हा प्रवाशांचा एक नियमही मी या प्रवासात मोडला होता. (पृष्ठ ५४) असे म्हणत लेखिका मनातील हुरहुर व्यक्त करते.

जन्मभूमी, जिथं आपला जन्म झाला, जिथं आपले ऋणानुबंध निर्माण झाले, माणसांचा आणि परिसराचा लळा लागला तेच आपले माहेर व तोच आपला गाव मानून लिहिलेला 'गावाकडच्या गोष्टी' हा लेख एक स्मरणचित्र आहे. आसाममध्ये असताना एका दंगलप्रसंगी देशोधडीला लागलेल्या एका असामी कुटुंबाने अननस देऊन भागविलेली भूक, आसाम रायफलमधील साताराकडचा एक सैनिक अचानक भेटतो, लळा लावतो व गावाच्या ओढीने पळूनही जातो. पेपरच्या पुड्यातून आई व ताईने पाठविलेला हलवा वगैरे वस्तू व पेपरमधील बातम्यांमधून कळलेली गावाकडची क्षुल्लक; परंतु ताजी खबर, अफगाण, जेरूसलेम, इस्रायल, काबूल, इंग्लंड, अमेरिका अशा अनेक देशांतील वास्तव्य; परंतु या प्रत्येक ठिकाणी भेटलेली परकीय माणसे गावाच्या ओढीने व्याकूळ होतात. नवी पिढी या अनोख्या संस्कृतीत स्वतःला मिसळून टाकते; परंतु ज्यांची मुळे गावाकडच्या मातीत रुजलेली आहेत, त्या पहिल्या- दुसऱ्या पिढीला गावाकडच्या आठवणी व ओढ सुटत नाही. त्यासाठी लेखिका अफगाणिस्तानचा राजा अमीर अमानुल्लाखानची एक आठवणही नोंदविते. इंग्रजांमुळे परागंदा झालेल्या या राजाला इटलीच्या राजाने आसरा दिला. काही वर्षांनी त्याला अफगाणिस्तानातून भेटायला आलेल्या इसमाला राजाची पत्नी पायपुसण्याला पाय पुसू देत नाही कारण आपल्या देशाची माती त्यानिमित्ताने घरात येईल ही तिची अपेक्षा. यावर भाष्य करताना लेखिका म्हणते, 'आपल्या

**स्त्रीसामर्थ्याला धर्मांच्या कडीकुलुपात बंद करणाऱ्या सर्व धर्मांची स्थापना करणारे सर्वच पुरुष होते. स्त्रीने धर्म स्थापन केल्याचे एकही उदाहरण जगात दाखविता येत नाही. पर्यायाने स्त्रीला भोगदासी बनविण्याचे षडयंत्र या धर्मसंस्थापकांनी नियोजनपूर्वक राबविले. त्यास धक्के देण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक स्त्रिया प्रारंभापासून आजपर्यंत पुढे आल्या. त्याचीही एक उज्वल परंपरा आहे; परंतु धर्मस्थापनेत स्त्रीने पुढाकार का घेतला नाही? घेतला असेल, तर पुढे त्याचे काय झाले? ज्यांनी घेतला त्यांची शोकांतिका का झाली? या प्रश्नांचा वेध घेणारा 'राजकन्या लुप्सुंग आणि रुकय्या सुलताना' हा लेख आहे.**

मातीचं प्रेम राजापासून सर्वसामान्यांपर्यंत सगळ्यांनाच असतं. (पृष्ठ ६२)आपणासही ही गावाची ओढ सुटत नसल्याची कबुली लेखिका देते. त्यातून 'जननी जन्मभूमिश्च। स्वर्गादपि गरीयसी।।' हेच खरे.

वरील आशयाशीच नाते सांगणारा; परंतु गांधीहत्येनंतरच्या जाळपोळीत नष्ट झालेल्या; आपलं घर, त्या परिसरातील माणसं, त्यांच्या संगत-विसंगत स्वभाववृत्ती, आप्पा ( वडील ) यांचा व आईचा परोपकारी स्वभाव आदी; बालपणाच्या काढलेल्या आठवणी मांडलेला 'नैहर छुटो न जाय' हा लेख आहे. लेखिका म्हणते, 'कोल्हापूरच्या त्या जुन्या घरात गुंतलेलं मन ३७ वर्षांनंतरही निर्मोही होत नव्हतं.' इचलकरंजीला वसंत व्याख्यानमालेच्या निमित्ताने गेलेल्या लेखिकेचे पाय सहजपणे तिकडे वळतात व टकळीतून सूत बाहेर पडावे तशा आठवणी बाहेर पडतात. जीवावर बेतलेल्या त्या प्रसंगाची आठवण, तेव्हाची अनामिक भीती, आप्पांवर पडणारा लाथांचा वर्षाव व पिसाळलेला जमाव, अय्यरांच्या रूपाने धावलेला परमेश्वर, त्यांनी केलेली सुटका, आप्पांची तत्त्वनिष्ठा, कुठेकुठे भेटलेले माणुसकीचे झरे आणि गावाकडच्या त्या घराच्या सांदीकोपऱ्यातून



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

163

धावलेली बालपावले या सर्वांविषयीच्या आठवणी लेखिकेला अनावर होतात. ते घर पुन्हा पाहताना मनात कल्लोळ निर्माण होतो व परत मागे फिरताना, 'तो किनारा आता कायमचा सुटला होता.' असे लेखिका म्हणते.

पर्यटनाचा छंद जोपासताना आलेल्या अनुभवांवर आधारलेले 'समुद्रमेळा' व 'अरण्य' हे दोन ललितलेख प्रवासवर्णनाचा सौंदर्यात्मक आविष्कार आहेत. समुद्रभेटीची ओढ व रत्नागिरीला भर पावसात पाहिलेल्या रौद्रभीषण समुद्रापेक्षा मुंबईचा समुद्र शिस्तीत वाढलेल्या मुलासारखा वाटतो; परंतु यापेक्षा लक्षद्वीपचा समुद्र, खरा तोच एकटा नि:संग समुद्र जसा कुठेच दिसायचा नाही. अशा या लक्षद्वीपच्या समुद्रसफारीचे वर्णन, चार दिवस चार रात्री केलेला प्रवास, भर दुपारचा निळाजर्द समुद्र, त्यावरील फेसाळत्या लाटा, लाटांवरील मोत्यांची उधळण, चांदीचा रस ओतल्यासारखी निळाई, सायंकाळचा सूर्याचा लालभडक गोळा व धूसर निळ्या रंगाचं आच्छादन असलेला समुद्र, रात्रीच्या प्रहरातला गहन-गहिरा काळा समुद्र, पहाटेच्या समयी संथपणे 'जागो मोहन प्यारे' चा आलाप आळवणारा समुद्र आणि सकाळी सकाळी निळ्याशार लाटांवर गुलाबी-सोनेरी झाक व खळाळत्या लाटांवर शुभ्रधवल फेस जणू मोगऱ्याचा गजरा अशा या समुद्रकिमया लेखिका शब्दांकित करते. कषाय, कुसुंबी, चिंतामणी हे फक्त वाचून-ऐकून माहीत असलेले रंग जणू साक्षात येथे अनुभवास येतात व अगस्ती ऋषीसारखा सौंदर्याच्या मोहात तो गिळून टाकण्याचा मोह लेखिकेला अनावर होतो. अशा या समुद्राच्या पोटातील जलसंपत्तीच्या दर्शनाने लेखिका अचंबित होते. 'या समुद्राच्या उदरात केवढं अजब विश्व सामावलेलं आहे! याला रत्नाकर म्हणतात ते उगाच नाही..' असे लेखिका म्हणते. अशा या समुद्राची ओढ अनाकलनीय, हीच समुद्रवेळा.

पेरियार सरोवराची भटकंती करताना भोवताली पसरलेल्या अरण्याच्या दर्शनाने व तो परिसर सोडून मागे फिरताना मनात उठलेल्या कल्लोळाने जे भावतरंग निर्माण झाले त्याचे अनुभवकथन 'अरण्य' या लेखात केलेले आहे. मखमली हिरवळीच्या घड्या घालून ठेवल्यासारख्या हिरव्या टेकड्या, त्यातून आळशीपणाने वळणे घेत वर सरकत गेलेल्या लाल मातीच्या पायवाटा, हत्ती, हरणे, वाघ यांच्या लीला पाहता पाहता अरण्याशी भावबंध जोडले गेले; परंतु त्याच वेळी पाहिलेल्या हरणाच्या कळपातील एका हरणाची शिकार करणाऱ्या वाघाचे दर्शन घडल्यावर वेदनेची लकेर खोल मनापर्यंत पोहोचली. बरोबरीच्या म्हातारीने 'जीवो जीवस्य जीवनम्' हाच इथला नियम असल्याचे सांगितल्यावर लेखिका स्तब्ध व उदास होते. शेवटी या अरण्यदेवतेशी आपले जन्मोजन्मीचे आदिम नाते असल्यासारखे तिला वाटते व लेखिका अनेक मागण्या करताना 'हे अरण्यदेवते! आयुष्यातला सगळा कुरूपपणा, क्रौर्य सांभाळूनही सौंदर्य उधळण्याचं, कोवळेपणा भोगण्याचं तुझं हे बळ तू मला दे!' (पृ१६७) अशीही विनवणी करते.

**समारोपापूर्वी :**

'स्मरणवेळा'तील ललितलेखांचा ललितगद्य म्हणून वेध घेताना जी वैशिष्ट्ये पहावयास मिळतात, त्यात आत्मनिष्ठता व ललितरम्यता यांचे सुरेख मिश्रण येथे दिसते. ललितगद्याच्या प्रकृतीनुसार या सर्व लेखांच्या केंद्रस्थानी 'मी' आहे. 'मी' च्या मनातील आठवणींचे तरंग ललितरम्य भाषेत व्यक्त होताना दिसतात.

स्त्रीपण किंवा बाईपणाचा एका स्त्री मनाने मांडलेला ताळेबंद व स्वत:सह समस्त स्त्रियांना पडणाऱ्या मर्यादांची प्रांजळ कबुली लेखिका देते. अर्थात आवश्यक तेथे कठोर भाष्यही करते.

उत्कट संवेदनशीलता, मनाचा हळवेपणा व काव्यमय चिंतनातून व्यक्त झालेली वैचारिकता व भाष्यात्मकता ही शैलीवैशिष्ट्ये पाहावयास मिळतात.

ऐतिहासिक संदर्भ दाखले मांडताना ते परीक्षणात्मक स्वरूपात मांडायचे व स्वत:ला त्या दृष्टीने तपासण्याचे तंत्र लेखिकेच्या अस्तित्वभानाचे प्रतीक आहे. या प्रसंगी भाष्यकाराची शैलीही वापरलेली आहे.

'स्मरणवेळा' हे शीर्षक लेखांच्या प्रकृतीला न्याय देणारे आहे.

❖❖

**डॉ. संजय नगरकर**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे-४११०६७
मो. ९०९६८७५७३७, ई-मेल : sapan_sanjay@gmail.com



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Aundh, Pune-67

164